1/4

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org
roaurangabad.dte@gmail.com

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०१० १३२५
दिनाकः- 16 FEB 2010

प्रति,
प्राचार्य/संचालक
शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका अभ्यासक्रम संस्था तसेच
एमबीए/एमसीए पदवयूत्तर पदवी अभ्यासक्रम संस्था

विषयः- विदयार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याबाबत.
मा.मुख्यमंत्री महोदयांची घोषणा

संदर्भः-१) कक्षअधिकारी,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण २०१०/(२१/२०१०)समन्वय दि.२८/१/२०१०
२) मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१६/संकीर्ण/२०१० /शा १४८ दि.२८/१/२०१०

उपरोक्त पत्र क्र.१ अन्वये संदर्भाधीन विषया बाबतचे सहपत्रासह असलेले पत्र सोबत जोडून पाठवित आहे. त्याचे अवलोकन व्हावे.

यावर आपण केलेली किंवा प्रस्तावित कार्यवाही बाबत तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः-या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना माहितीस्तव देवून सूचित करण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र.१ पत्र सहपत्रासह कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावे.

LETTER 51 2/15/2010 5:28 PM

२५

महाराष्ट्र शासन

**तात्काळ**

क्रमांक:- संकीर्ण २०१०/(२१/२०१०)/समन्वय
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.
दिनांक :- २० जानेवारी, २०१०.

प्रति,
संचालक , उच्च शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्रशिक्षण , तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.
संचालक, प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.
संचालक, कला, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, ग्रंथालये, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांची घोषणा.

संदर्भ : दि.१८/१/२०१० रोजीच्या "सकाळ" वर्तमान पत्रातील बातमी.

महोदय,

१. उपरोक्त विषयावरील सोबत जोडलेली संदर्भाधीन वर्तमानपत्रातील प्रत कृपया पहावी.

२. वरील विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन वर्तमानपत्रातील वृत्त आपल्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्यावर आपण केलेली किंवा प्रस्तावित कार्यवाहीबाबत या विभागास तात्काळ कळविण्यात यावे, ही विनंती

आपला,

( मं.हिं.बनसोडे )
कक्ष अधिकारी

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,
उपसचिव (व्यशि/ मशि /आस्था/तंशि/विशि/ग्रंथालये व कला), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

का-९६
विद्गा.
२२/१

तंत्रशिक्षण संचालनालय,
आ-९८८
२०/१/१०
९६

D:\DESKOF~1\COPYFI~1\AWAITL~1\file cases.doc

(3/4)

<u>मा.मुख्यमंत्र्यांची घोषणा</u>

मुख्यमंत्र्यांचे सचिवालय / जनसंपर्क कक्ष
१८ जानेवारी २०१०

**विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणार** अशी घोषणा मा.मुख्यमंत्र्यांनी नांदेड येथे केली आहे. या आशयाचे वृत्त आपल्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवित आहे.

सोबत : वृत्ताची प्रत.

**( सुरेश वांदिले )**
**मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी**

मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

मा.सचिव (शालेय शिक्षण)

DS(T)

सकाळ 18/1/10

4/4

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणार : मुख्यमंत्री

## पालक, शिक्षणमंत्र्यांशी चर्चा करणार

नांदेड, ता. १७ (बातमीदार) : राज्यातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या, ही बाब गंभीर असून, पालक, विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी चर्चा करून, धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन पुढाकार घेईल, अशी माहिती मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी रविवारी (ता. १७) पत्रकारांशी बोलताना दिली. मात्र, हे करत असतानाच शिक्षणात रोज नवीन प्रयोग व्हायला नकोत. जो काही निर्णय घ्यायचाय तो विचारपूर्वक घ्यावा, एवढेच म्हणणे असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री चव्हाण यांचे रविवारी सकाळी नांदेडला आगमन झाले. त्या वेळी विश्रामगृहावर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत मुख्यमंत्री चव्हाण म्हणाले, की शिक्षणपद्धती कशी असावी, याबाबत मतभिन्नता असू शकते. कोणताही चित्रपट पाहून आत्महत्या होत नसतात, त्याचा तेवढा परिणाम होत नसतो. चित्रपटाच्या आधारे शासनाने धोरण ठरवावे, या मताचा मी नाही. याबाबतीत पालक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ या सर्वांनी मिळून निर्णय घ्यावा.

राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांना जाणे अधिक सोयीचे व्हावे आणि पर्यटनालाही चालना मिळावी, या दृष्टिकोनातून आपण माहिती घेत असून, नांदेडमध्येही पर्यटनाला चांगला वाव असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यातील सतीश शेट्टी यांची दिवसाढवळ्या झालेली हत्या किंवा इचलकरंजी येथील झालेली हत्या पाहता, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत विचारले असता, मुख्यमंत्री चव्हाण यांनी आपण याबाबत पुण्याच्या पोलिस आयुक्तांशी बोललो आहोत, लवकरच पुढील कारवाई करण्यात येईल, असे सांगितले.

मुख्यमंत्री चव्हाण यांनी या वेळी अनेक प्रश्नांना उत्तरे देण्याचे टाळले.